**राज्यकर सह आयुक्त पदावरुन अपर राज्यकर आयुक्त पदावर पदोन्नती आणि पदस्थापना**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन आदेश क्रमांक - विकवि १६२५/प्र.क्र.२१९/वि.प्र.१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०००३२
**दिनांक : १८ मे, २०२६**

**आदेश -**

शासन असा आदेश देत आहे की, वस्तू व सेवाकर विभागातील खालील नमूद राज्यकर सह आयुक्त यांना "अपर राज्यकर आयुक्त" या पदावर एस २८ ₹१,२४,८००-२,१२,४०० या वेतनस्तरामध्ये, ते ज्या दिवशी सदर पदाचा कार्यभार स्वीकारतील त्या दिनांकापासून सन २०२५-२६ च्या निवडसूचीवर निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोरील स्तंभ ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | सध्या कार्यरत असलेल्या पदाचा महाविकास सांकेतांक | पदोन्नतीनंतरची पदस्थापना महाविकास सांकेतांकासह |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. सुदाम रामकृष्ण गवळी | MUM-NOD-F-०००७ | THA-ZON-G-०००१ |
| २ | श्री. ज्ञानेश शरद हिंगे | MUM-NOD-F-०००६ | MUM-ZON-G-०००३ |
| ३ | श्री. नामदेव भिमाजी आरोटे | KOL-NOD-F-०००२ | KOL-ZON-G-०००१ |
| ४ | श्री. मल्लीनाथ सिदरामअप्पा उपासे | MUM-APP-F-०००८ | CST-HQR-G-०००३ |
| ५ | श्री. दिपक प्रल्हादराव जाधव | MUM-NOD-F-०००१ | MUM-ZON-G-०००२ |
| ६ | श्रीमती सुनीता समरजीत थोरात | MUM-NOD-F-००१० | CST-HQR-G-०००२ |
| ७ | श्री. अप्पासाहेब सोनाजीराव गोर्डे | MUM-NOD-F-०००४ | CST-HQR-G-०००५ |

**२.** सदर अधिका-यांना अपर राज्यकर आयुक्त पदावरील तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१. मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील निर्णयास अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.
२. सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दिनांक २५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठतायादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री करण्यात आली आहे.

३. सदर पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४. सदर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेल्या पदोन्नतीमुळे सदर अधिका-यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाही.

**३.** सदर अधिका-यांनी राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी विचारविनिमय करुन नवीन पदाचा कार्यभार तात्काळ स्वीकृत करावा.

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

**४.** सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashrtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असुन, त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५१८११५१३३७६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIKRAM NIVRUTTI DHAMAL

Digitally signed by VIKRAM NIVRUTTI DHAMAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=23b2f1b1fd914a87080cb68712db5efd17f65e69284fe1d3274a32de69eb6a25, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=10D36944A4B86EAB516B1B70183709C5FB570CFDF5A52755ADFEF51ED380B836, cn=VIKRAM NIVRUTTI DHAMAL
Date: 2026.05.18 11:53:20 +05'30'

**( विक्रम नि. ढमाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री ( वित्त ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा ), वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई.
६. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) व (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
८. अधिदान व लेखा अधिकारी / निवासी लेखा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, ठाणे/ कोल्हापुर ( विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई मार्फ़त )
१०. सह सचिव / आस्थामं (१३ ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. संबंधीत अधिकारी (विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव,मुंबई मार्फत).
१२. निवडनस्ती.